# निशाणी क्र. ११९ वरील आदेश

वादीने प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. ११ यांचे विरूध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करून प्रस्तूत प्रतिवादीचे वारस अभिलेखावर घेणेसाठी दाखल केला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, प्रस्तूत कामी प्रतिवादी क्र. ११ नंदकिशोर कृष्णा मालंडकर हे दि. २९/०४/२०२१ रोजी मयत झाले आहेत. कोरोना विषाणुच्या प्रादुर्भावामुळे सदर प्रतिवादींचे वारस मुदतीत दाखल करता आलेले नाहीत. त्यामुळे प्रस्तूत प्रतिवादीविरुध्द दावा अबेट झाला आहे. प्रस्तूत दावा ठराव व ताकिदीचे दादीकरीता दाखल केला आहे. वादी व प्रतिवादीमधील वादाचे अंतिम निराकरण होण्यासाठी मयत प्रतिवादीचे वारसांना दाव्याचे कामी समाविष्ट करणे आवश्यक आहे. सबब, सदर अबेटमेंट आदेश रद्द करून प्रस्तूत प्रतिवादी याचे वारस दाखल करणेस परवानगी मिळावी अशी विनंती वादीने केली आहे.

२. प्रतिवादी यांनी सदर अर्जावर म्हणणे दाखल केले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, वादीचा अर्ज नामंजूर करणेत यावा यदाकदाचित अर्ज मंजूर करणे न्याय्य ठरु लागल्यास वादीच्या निष्काळजीपणाच्या खोडमोडीकरीता रक्कम रु.५००/– इतका खर्च बसविण्यात यावा अशी विनंती प्रस्तूत प्रतिवादी यांनी केली आहे.

३. वादी व प्रतिवादी यांच्यातर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

४. प्रस्तूत प्रतिवादी क्र. ११ नंदकिशोर कृष्णा मालंडकर हे दि. २९/०४/२०२१ रोजी मयत झाले आहेत असे दिसून येते. प्रस्तूत प्रतिवादी हे मयत झाले आहेत, याबाबत वाद दिसून येत नाही. सदरचा दावा ठराव व ताकिदीचे दादीकरीता दाखल केला आहे. सदर दाव्यास प्रस्तूत प्रतिवादीचे वारस हे आवश्यक पक्षकार आहेत. त्यामुळे अबेटमेंटचा आदेश रद्द करणे न्यायोचित वाटते. परिणामी प्रस्तुतचा अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. सबब, खालील आदेश पारीत करीत आहे:

**–आदेश –**

१. प्रस्तूतचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. खर्चाबाबत आदेश नाही.

स्थळ : देवगड ( बी.आर.पाटील )

दिनांक: १६/०२/२०२२ दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.

Digitally signed by BALKRISHNA RAJARAM PATIL
Date: 2022.02.17 10:48:07 +0530